श्री भैय्याजी पांढरीपांडे
नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ सोशल वर्क
हनुमान नगर, नागपूर.—२४

# राष्ट्रीय सेवा योजना

# विशेष ग्रामीण शिबीर

# अहवाल

# २०२५—२०२६

दिनांक : ०९ ते १४ फेब्रुवारी २०२६
कुही मांडळ, नागपूर

डॉ. पवन येवतकर
ग्रामीण शिबीर प्रमुख

डॉ. सुनिल कोडापे
कार्यकारी प्राचार्य

# बी.पी.नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ सोशल वर्क,
# हनुमान नगर, नागपूर.

## विशेष ग्रामीण शिबीर समिती २०२५–२६

समिती सदस्य :

| | |
|---|---|
| ➢ कार्यकारी प्राचार्य डॉ. सुनिल कोडापे | अध्यक्ष |
| ➢ प्रा. डॉ.पवन येवतकर | कार्यक्रम अधिकारी/प्रभारी |
| ➢ प्रा. डॉ. लक्ष्मी डाखोळे | शिक्षक प्रतिनिधी |
| ➢ कु. कल्याणी उगेमुगे | विद्यार्थी प्रतिनिधी |
| ➢ कु. खुशी गायकवाड | विद्यार्थी प्रतिनिधी |
| ➢ रोहित मेश्राम | विद्यार्थी प्रतिनिधी |
| ➢ कु. पल्लवी माळोदे | विद्यार्थी प्रतिनिधी |
| ➢ कु. शिवांगी गुप्ता | विद्यार्थी प्रतिनिधी |
| ➢ कु. साक्षी चौधरी | विद्यार्थी प्रतिनिधी |
| ➢ विजय नरोटे | विद्यार्थी प्रतिनिधी |

# रासेयो विशेष ग्रामिण शिबीर अहवाल २०२५–२६

<u>कुही मांडळ, नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष ग्रामिण शिबीर</u>

नागरिक शिक्षण मंडळ, नागपूर व्दारा संचालित श्री. भैय्याजी पांढरीपांडे नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ सोशल वर्क, हनुमान नगर, नागपूर या महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विशेष ग्रामिण शिबिर दि. ०९ ते १४ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत कुही मांडळ, नागपूर येथे सपंन्न झाले.

**दि. ०७/०२/२०२६ ला सकाळी ११.३०** वाजता रासेयो स्वयंसेवकांचे अंतिम उद्‌बोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. शिबीर प्रमुख डॉ. पवन येवतकर आणि सहप्रमुख सौ. शर्मिला पांगुळ–दरणे यांनी उद्‌बोधन कार्यक्रमामध्ये शिबिरातील कार्य करणाऱ्या समित्या याविषयी माहिती दिली तसेच शिबिरामध्ये राबविण्यात येणारे विविध उपक्रम युथ फॉर डिजीटल इंडीया, युथ फॉर माय भारत, अंधश्रध्दा निमूर्लन, स्वच्छता, आरोग्य, महिला सक्षमीकरण, श्रमदान, पथनाटय, जनजागृती रॅली इ. उपक्रमांवर विद्यार्थ्यांची तयारी संबंधी चर्चा करून झालेली तयारी तपासण्यात आली. रासेयो स्वयंसेवकांना येणाऱ्या अडचणी संबंधी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच शिबिरातील नियमावली, अटी आणि सोबत आणावयाचे साहित्य याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. त्यांनतर दुपारी १.०० वाजता महाविद्यालयातील परिसरामध्ये विद्यार्थ्यांव्दारे शिबीरासाठी लागणारे सर्व साहित्य एकत्रित करण्यात आले.

**दि. ९/०२/२०२६ ला** रासेयो कार्यक्रम अधिकारी/शिबीर प्रमुख डॉ पवन येवतकर आणि सहप्रमुख सौ. शर्मिला पांगुळ–दरणे सहायक, श्री रामा तिजारे आणि १५ विद्यार्थी आणि ३५ विद्यार्थीनी एकूण ५० रासेयो स्वयंसेवक सकाळी ८.०० वा. महाविद्यालय परिसरात एकत्र होऊन सकाळी ९.०० वा कुही, मांडळ जि. नागपूर गावाकडे बसने प्रस्थान केले. शिबीराच्या नियोजनाप्रमाणे विद्यार्थ्यांची निवासाची व्यवस्था राष्ट्रीय विद्यालय मांडळ या शाळेमध्ये करण्यात आली होती. सर्व विद्यार्थी सकाळी १०.३० वाजता मांडळ येथे पोहचल्यानंतर विद्यार्थ्यांनी निवासाची व्यवस्था केली आणि परिसर वापरण्यासाठी शौचालये आणि स्नानगृहे स्वच्छ करण्यात आलेत. तसेच शिबीर सभागृह, भोजनगृह याची तयारी करण्यात आली. शिबीरातील स्वयंसेवकांची दुपारच्या भोजनानंतर शिबीराच्या उद्‌घाटन कार्यक्रमासंबंधी विद्यार्थ्यांची सभा घेण्यात आली. यामध्ये ग्रामीण शिबीर उद्‌घाटन कार्यक्रमाचे उद्‌घाटक प्रमुख पाहुणे डॉ. अनिल सरगर, कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुनिल कोडापे, कार्यकारी प्राचार्य आणि शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

सांय. ७.०० वा. ग्रामीण शिबीराचा उद्‌घाटन कार्यक्रम घेण्यात आला. या ग्रामीण शिबीराच्या उद्‌घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. अनिल सरगर शाळेचे कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित असुन डॉ. पवन येवतकर, सर्व शिबीरार्थी आणि ग्रामस्थ मोठया संख्येने उद्‌घाटन कार्यक्रमाला उपस्थित होते. व त्या प्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. शिबीराच्या उद्‌घाटन कार्यक्रमाचे संचालन आणि

शिबिराचे प्रास्ताविक डॉ. पवन येवतकर यांनी तर आभार प्रदर्शन सौ. शर्मिला पांगुळ–दरणे यांनी केले. शिबीराच्या उद्घाटन कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांनी कला व कौशल्यावर आधारित ग्रामस्थांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

**दि. १०/०२/२०२६ ला पहाटे ६.०० वा**. 'योग व प्राणायाम' शिबीराचे उद्घाटन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. लक्ष्मी डाखोळे यांनी रासेयो स्वयंसेवकांना प्राणायाम व योगासनाचे महत्व तसेच योग व प्राणायमाचा सराव शिबीर दरम्यान विद्यार्थ्याकिडुन करून घेतला. सकाळी ७.३० ते ९.३० वा. राष्ट्रीय विद्यालय मांडळ या शाळेमध्ये शिबीरार्थ्यांनी श्रमदान शिबीर परिसर सफाई व स्वच्छता अभियान घेण्यात आली. त्यानंतर सकाळी १०.३० ते १२.०० या कालावधित सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रमाची पुर्व तयारी करण्यात आली. हा कार्यक्रम राष्ट्रीय विद्यालय मांडळ आणि श्री. भैय्याजी पांढरीपांडे नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ सोशल वर्क, हनुमान नगर, नागपूर या महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विशेष ग्रामिण शिबिर यांच्या संयूक्त विद्यमानाने प्रचंड मोठया उत्साहात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये राष्ट्रीय विद्यालय मांडळ येथील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि वर्ग ५ ते १० चे विद्यार्थी तसेच शिबीरार्थ्यांनी सहभाग घेतला. हा कार्यक्रम दुपारी १२.३० ते २.३० या कालावधीमध्ये संपन्न झाला.

सायंकाळच्या सत्रामध्ये ७.०० ते ९.०० या कालावधित प्रार्थना आणि विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शन करणारे नाटक, समूह नृत्य, कला कौशल्यावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

**दि. ११/०२/२०२६ ला सकाळी ६.००वा.** स्वंयसेवकांना योगा व प्राणायामचे प्रशिक्षण देण्यात आले आणि प्रार्थना घेण्यात आली. सकाळी ७.३० ते ९.३० या कालावधित शिबीरार्थ्यांनी प्रभात फेरी व डिजिटल सुरक्षा पथनाटय गावामध्ये करण्यात आली. सकाळी १०.३० ते १२.०० च्या दरम्यान शिबीरार्थ्यांद्वारे श्रमदान ग्रामसफाई व स्वच्छता अभियान घेण्यात आले.

दुपारच्या बौध्दिक सत्रामध्ये दुपारी २.०० वाजता प्रा. डॉ. पवन येवतकर यांनी युथ फॉर डिजीटल इंडीया आणि सायबर सुरक्षा या विषयावर शिबिरार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर सायंकाळच्या सत्रामध्ये ७.०० ते ९.०० या कालावधित प्रार्थना आणि विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शन करणारे नाटक, समूह नृत्य, कला कौशल्यावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

**दि. १२/०२/२०२६ ला सकाळी ६.००वा.** स्वंयसेवकांना योगा व प्राणायामचे प्रशिक्षण देण्यात आले आणि प्रार्थना घेण्यात आली. सकाळी ७.३० ते ९.३० या कालावधित शिबीरार्थ्यांनी प्रभात फेरी व महिलांच्या समस्या या विषयावर पथनाटय गावामध्ये करण्यात आले. सकाळी १०.३० ते १२.०० च्या दरम्यान शिबीरार्थ्यांद्वारे लाडकी बहिण योजना व स्वयम रोजगार योजना याविषयी जनजागृती अभियान घेण्यात आले.

दुपारच्या बौध्दिक सत्रामध्ये दुपारी २.०० वाजता प्रा. डॉ. पवन येवतकर यांनी स्वयम रोजगार योजना आणि स्वयम रोजगाराचे महत्व या विषयावर शिबिरार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर सायंकाळच्या सत्रामध्ये ७.०० ते ९.०० या कालावधित प्रार्थना आणि विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शन करणारे नाटक, समूह नृत्य, कला कौशल्यावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला

**दि. १३/०२/२०२६ ला सकाळी ६.०० वा** स्वंयसेवकांना योगा व प्राणायामचे प्रशिक्षण देण्यात आले आणि प्रार्थना घेण्यात आली. सकाळी ७.३० ते ९.३० या कालावधीत शिबीरार्थ्यांनी प्रभात फेरी व महिला सक्षमीकरण या विषयावर पथनाटय गावामध्ये सादर करण्यात आली. सकाळी ९.३० ते १०.३० वा. शिबीरार्थ्यांनी मांडळ येथे ग्रामसर्वेक्षण करण्यात आले.

दुपारच्या बौध्दिक सत्रामध्ये दुपारी २.०० वाजता प्रा. डॉ. लक्ष्मी डाखोळे यांनी ग्रामसर्वेक्षण या विषयावर शिबिरार्थ्यांकडून सादरीकरण करून घेतले. आणि सर्वेक्षणा दरम्यान शिबिरार्थ्यांना जाणवलेल्या विविध ग्रामीण समस्यांवर चर्चा सत्र आयोजित केलें. त्यानंतर ४.०० ते ५.०० वाजता विशेष ग्रामीण शिबीराचा समारोप कार्यक्रमासंबंधी स्वयंसेवकाना माहिती देण्यात आली. आणि समारोपीय कार्यक्रमाची पुर्व तयारी करण्यास सांगण्यात आले.

सांयकाळी ७.०० वाजता पासून विशेष ग्रामीण शिबीराचा समारोप कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली. समारोप कार्यक्रमाचे सुत्रसंचालन, स्वयंसेवकांचे शिबीरासंबंधी मनोगत, पाहुण्याची स्वागत, पाहुण्याची भोजन व्यवस्था इत्यादी मुद्यांसबंधी स्वयंसेवकांसोबत नियोजनात्मक चर्चा करण्यात आली. स्वयंसेकवांवर शिबीर समारोप कार्यक्रमाची जबाबदारी सोपविण्यात आली. ग्रामीण शिबीराचा समारोप समारंभ कार्यक्रम प्रारंभ करण्यात आला. या ग्रामीण शिबीराचा समारोप प्रसंगी व्यासपीठावर अध्यक्ष महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. सुनिल कोडापे, शिबीर प्रमुख डॉ. पवन येवतकर, सह प्रमुख सौ. शर्मिला पांगुळ–दरणे शिबीर सहायक श्री रामा तिजारे महाविद्यालयातील कार्यकारी प्राचार्य डॉ. सुनिल कोडापे प्रमुख पाहुणे म्हणुन शिक्षकेत्तर कर्मचारी श्री कमलाकर ढबाले, श्री रूपेश ढाले, सौ. अनिशा दुरगकर आणि सौ. शुभांगी महाकाळकर व सर्व शिबीरार्थी आणि ग्रामस्थ समारोपीय कार्यक्रमाला उपस्थित होते. या समारोपीय कार्यक्रमामध्ये सुरवातीला शिबीर प्रमुख प्रा. डॉ. पवन येवतकर यांनी विशेष ग्रामीण शिबीराचा अहवाल सादर केला. यामध्ये शिबीरातील यशस्वी उपक्रमाविषयी व कार्यक्रमाची माहिती दिली आणि शिबीरातील अनुभव व्यक्त केले. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी एक एक करून शिबिरासंबंधी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर मान्यवरांची भाषणे झालीत. यामध्ये त्यांनी शिबीराचा गावाला झालेल्या फायद्याविषयी मनोगत व्यक्त केलेत. ग्रामिण शिबीराच्या समारोप कार्यक्रमाचे प्रमुख पाहुण्यांनी शिबीरातुन गावविकासाला हातभार लागतो आणि गावातील विद्यार्थ्यांच्या कलागुण व कौशल्याचा विकास होतो. स्वत:च्या विकासाला संधी देण्यासाठी शिबाराची आवश्यकता असते असे प्रतिपादन करुन विद्यार्थ्यांना प्रेरणात्मक मार्गदर्शन केले तसेच सर्व शिबीरार्थी आणि आयोजकांना धन्यवाद व शुभेच्छा दिल्यात.

शिबीर प्रमुख प्रा. डॉ. पवन येवतकर आणि महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. सुनिल कोडापे यांनी शिबीरातील विद्यार्थ्यांचे आणि गावातील युवकांचे कौतुक व गावकऱ्यांचे सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शेवटी सौ. शर्मिला पांगुळ–दरणे यांनी समारोपीय कार्यक्रमातील पाहुण्याचे आभार व्यक्त केले. तसेच या शिबीराच्या यशस्वीतेकरिता सहकार्य केले अश्या सर्व मान्यवरांचे, वक्त्यांचे, सहकाऱ्याचे आभार व्यक्त करून समारोपीय कार्यक्रम समाप्त करण्यात आला. त्यानंतर कार्यक्रमाला उपस्थित सर्व पाहुण्यानी आणि गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी स्नेहभोजनाचा आनंद घेतला. जेवनानंतर रात्री १०.०० ला शिबीर यशस्वीतेबद्दल 'कॅम्प फायर' कार्यक्रमातुन स्वयंसेवकांनी आनंद व्यक्त केला.

**दि. १४/०२/२०२६ ला सकाळी ६.०० वा** स्वंयसेवकांना योगा व प्राणायामचे प्रशिक्षण देण्यात आले आणि प्रार्थना घेण्यात आली. सकाळी ७.३० ते ९.३० वा. राष्ट्रीय विद्यालय मांडळ या शाळेमध्ये शिबीरार्थ्यांनी श्रमदान शिबीर परिसर सफाई व स्वच्छता अभियान घेण्यात आले.

राष्ट्रीय विद्यालय मांडळ वरून प्रस्थानाची तयारी करण्यास सुरूवात झाली. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री. वानखेडे सर आणि शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक श्री. वानखेडे सर यांनी शिबिरार्थीचे अभिनंदन आणि मार्गदर्शन केले. विद्यापीठ गीत व महाराष्ट्र गीत झाल्यानंतर राष्ट्रीय सेवा योजना ध्वजाला मानवंदना देवुन शिबीर प्रमुखांनी ध्वज उतरविला. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. विद्यार्थ्याचे शिबिराविषयी अभिप्राय भरून घेण्यात आले. तसेच शिबिरामध्ये दिलेल्या सहकार्य व योगदानाबद्दल विद्यार्थ्यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले. शेवटी शिबिरार्थ्यांनी चहा नाश्त्याचा आनंद घेऊन सकाळी ११.०० वा. बसने नागपूरला येण्यासाठी मांडळवरून प्रस्थान केले.

महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. सुनिल कोडापे यांनी मला शिबीर प्रमुख म्हणुन संधी दिली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसचे शिबीर कालावधीत शिबीराला भेट व सहकार्य केल्याबद्दल, डॉ. अनिल सरगर, शिक्षकेत्तर कर्मचारी श्री कमलाकर ढबाले, रूपेश ढाले शिबीर सहप्रमुख डॉ. लक्ष्मी डाखोळे, सौ. शर्मिला पांगुळ–दरणे सहायक, श्री रामा तिजारे यांचा मी अत्यंत आभारी आहे. ग्रामीण शिबीर यशस्वी करण्यासाठी ज्यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य केले या सर्वांचे मन:पुर्वक आभार मानतो.

डॉ. पवन येवतकर
रासेयो शिबीर प्रमुख (२०२५–२६)

डॉ. सुनिल कोडापे
कार्यकारी प्राचार्य

ग्राम मांडळ ता.कुही जि. नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष ग्रामीण शिबीरातील काही क्षणचित्रे






ग्रामीण शिबीरात रासेयो ध्वज वंदना करतांना रासेयो कार्यक्रम अधिकारी आणि शिबिरार्थी







ग्रामीण शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. सुनिल कोडापे आणि डॉ. अनिल सरगर







ग्रामीण शिबीरात योगासन करतांना शिबीरार्थी







ग्रामीण शिबीरात प्रभाप फेरी काढुन प्रबोधन करतांना शिबीरार्थी

|  | <br> |
| --- | --- |
| ग्रामीण  शिबीरात पथनाटय करतांना विद्यार्थी | |
| <br> | <br> |
| ग्रामीण शिबीरात अवयव दान कार्यक्रमाचा लाभ घेतांना विद्यार्थी | |





ग्रामीण शिबीरात गावातील सर्वेक्षण करतांना विद्यार्थी






ग्रामीण शिबीरातील समारोप कार्यक्रमातील काही क्षणचित्रे